THE YASH ACADEMY ™

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक - 2

## SUBJECTWISE QUESTION SET

## 2013

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

# पोलीस उपनिरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

## अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

1. **चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

2. **माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

3. **संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

THE TM
YASH ACADEMY

**पेपर क्रमांक - 2**

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल -** महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान.

3 **महाराष्ट्राचा इतिहास -** सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे -शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका.

5 **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** – संकल्पना - आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955, मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम1989, हुंडाबंदी अधिनियम 1961, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

6 **मुंबई पोलीस अधिनियम, 1951** (Maharashtra Police Act)

7 **भारतीय दंड संहिता, 1860** (Indian Penal Code)

8 **फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973** (Criminal Procedure Code)

9 **भारतीय पुरावा अधिनियम, 1872** (Indian Evidence Act.)

| पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा (पेपर – 2)<br>PAPER ANALYSIS - SUBJECTWISE | |
|---|---|
| विषय | वर्ष (2013) |
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | 11 |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 10 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 12 |
| इतिहास [HISTORY] | 05 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 13 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | 03 |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | 09 |
| मानवी हक्क व जबाबदाऱ्या [HUMAN RIGHTS & RESPONBILITIES] | 19 |
| मुंबई पोलीस कायदा [MUMBAI POLICE ACT] | 07 |
| भारतीय दंड संहिता [INDIAN PENAL CODE] | 04 |
| फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973 [CRIMINAL PROCEDURE CODE-1973] | 05 |
| भारतीय पुरावा कायदा [INDIAN EVIDENCE ACT] | 02 |
| | 100 |

* 2017 च्या बदलेल्या अभ्यासक्रमानुसार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम - 2005 व संगणक व माहिती तंत्रज्ञान हे घटक पेपर क्रमांक 1 मध्ये समाविष्ट केले आहे.

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१३

| परीक्षा दिनांक : 8 डिसेंबर, 2013<br>वेळ : 2 तास | सामान्य अध्ययन - पेपर २ | एकुण प्रश्न : 100<br>एकुण गुण : 100 |
|---|---|---|

## चालू घडामोडी व इतर घटक

1. खालील जोड्यांची जुळणी करा.

| सन्मान | सन्मानीत |
|---|---|
| A. 90 व्या वाढदिवसानिमित्त ऑस्ट्रीयन सरकारचे टपाल तिकीट | I. पंतप्रधान मनमोहन सिंग |
| B. क्लींटन ग्लोबल सिटीझन | II. हरदीप पुरी |
| C. जेफरसन पुरस्कार | III. एम. करुणानिधी |
| D. मॉस्को स्टेट इन्स्टिट्युट ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स कडून पी.एच.डी. | IV. बंकर रॉय |
| | IV. अश्विनी अंगडी |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | III | IV | II | I |
| 2) | I | II | III | IV |
| 3) | II | III | I | V |
| 4) | IV | I | V | II |

2. 'सोडिअम एअर हीट एक्सचेंजर' बाबतच्या खालील विधानांचा विचार करा :
अ. 500 मेगावॉट वीजनिर्मिती करणाऱ्या अणुभट्टीत ते वापरतात.
ब. महाराष्ट्रातील वालचंदनगर उद्योगात त्याची निर्मिती करण्यात आली.
क. या संयंत्राची निर्मिती करणारा भारत जागातील दुसरा देश आहे, फ्रान्स हा पहिला देश आहे.
ड. नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक दोषामुळे जेव्हा अणुभट्टी बंद पडते तेव्हा ते उर्वरीत उष्णता बाहेर काढून अणुभट्टीला स्फोट होण्यापासून वाचविते.
वर दिलेल्या विधानांपैकी कोणते / कोणती विधान / विधाने बरोबर आहेत?
1) केवळ अ  2) केवळ ब आणि क  3) केवळ अ, ब आणि क  4) सर्व

THE YASH ACADEMY TM

3. आर.बी.आय. गव्हर्नर रघुराम राजन यांच्या नेतृत्वा खालील गटाने नुकताच राज्यांसाठी नवा विकास निर्देशक सुचविला आहे. त्यानुसार राज्यांची विविध प्रकारात वर्गवारी केली आहे. खालीलपैकी कोणता वर्गप्रकार त्यात समाविष्ट नाही?
1) अत्यल्प विकसित  2) अल्प विकसित  3) तुलनात्मक दृष्टीने विकसित  4) पूर्णपणे विकसित

4. सुपरनोव्हा बाबतच्या खालील विधानांचा विचार करा :
अ. सुपरनोव्हा ही स्फोटहोऊन मृत्यु होणाऱ्या ताऱ्याची प्रक्रिया असून त्याने सोडलेल्या पदार्थाची वर्तुळाकार रचना तयार होते.
ब. मृत ताऱ्याच्या उर्वरित वस्तुला अवशेष म्हणतात.
क. अंदाजीत 1000 सुपरनोव्हापैकी केवळ 270 चा शोध लागला व त्यापैकी दोघांचा शोध गेल्या 400 वर्षात लागला.
ड. सुभासिस रॉय आणि सव्यसाची पाल या भारतीय वैज्ञानिकांनी अलिकडेच सर्वात तरूण सुपरनोव्हाचा शोध लावला आहे.
वरीलपैकी कोणते / कोणती विधान / विधाने बरोबर आहेत?
1) केवळ अ  2) केवळ ब आणि क  3) केवळ अ, ब आणि क  4) सर्व

5. स्टेला हे काय आहे?
1) जगातील वेगवान महिला खेळाडू.  2) जगातील पहिली जास्त क्षमतेची अण्विक भट्टी.
3) जगातील पहिली सौरउर्जेवर चालणारी कार.  4) जगातील पहिली पाणबुडी.

6. भारताच्या 'मार्स ऑर्बिटर मिशन' 2013 (मंगळ्यान अभियान) बाबत खालील विधाने विचारात घ्या :
अ. एकूण वजन 1340 कि. ग्रॅ.
ब. एकूण 5 शास्त्रीय उपकरणे.
क. मिथेन चा शोध घेणे.
ड. अभियानाचा एकूण खर्च रू. 450 कोटी.
वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर नाही?
1) अ फक्त
2) अ आणि ब
3) क आणि ड
4) वरीलपैकी कोणतेही नाही

7. 'पद्मभूषण' पुरस्कार 2013 संदर्भात सूची 'A' व सूची 'B' मधील जोड्या लावा.

| A (व्यक्ति) | B (क्षेत्र) |
|---|---|
| A. डॉ. सरोजा वैद्यनाथन | I. जन सेवा |
| B. डॉ. विजय कुमार सारस्वत | II. कला |
| C. महाराज किशन भान | III. विज्ञान व अभियांत्रिकी |
| D. शिवाजीराव गिरीधर पाटील | IV. नागरी सेवा |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | I | II | III | IV |
| 2) | II | III | IV | I |
| 3) | III | IV | II | I |
| 4) | IV | I | II | III |

8. 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा-2013' बाबत खालील विधाने विचारात घ्या :
अ. लाभार्थीस प्रत्येकी 5 किलो धान्य प्रत्येक महिन्यास मिळण्याचा अधिकार.
ब. 75% शहरी व 50% ग्रामीण लोकसंख्येस फायदा.
क. किमान रु. 6,000 मातृत्व लाभ.
ड. 6 महिने ते 6 वर्षे वयापर्यंतच्या मुलांना मोफत पुरेसे भोजन.
वरीलपैकी कोणते विधान / विधाने चूकीचे आहेत?
1) अ फक्त
2) ब फक्त
3) क आणि ड
4) वरीलपैकी कोणतेही नाही

9. इलेनॉर कॅटॉन बाबतच्या खालील विधानांचा विचार करा :
अ. तिने प्रतिष्ठेचे 'बुकर पारितोषिक' मिळविले आहे.
ब. 'द लुमिनरीज' कादंबरीकरिता ते पारितोषिक तिला बहाल करण्यात आले.
क. कादंबरी 832 पानांची असून पारितोषिकाच्या इतिहासात सर्वात मोठी आहे, तर कादंबरीकार सर्वात लहान 28 वर्षे वयाची आहे.
ड. ती राष्ट्रकुल देशातील शेवटची विजेती आहे कारण पुढील वर्षापासून हे पारितोषिक जगातील सर्वांसाठी खुले केले जाणार आहे.
वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत?
1) केवळ अ आणि ब
2) केवळ ब आणि क
3) केवळ अ, ब आणि क
4) सर्व

THE YASH ACADEMY TM

10. सूची 'A' व सूची 'B' मधील जोड्या जुळवा.

| A (क्षेपणास्त्र) | B (प्रकार) |
|---|---|
| A. अग्नी - I | I. मध्यम पल्ल्याचे क्षेपणास्त्र |
| B. निर्भय | II. सुपरसॉनिक क्रूझ |
| C. ब्राम्होस - I | III. अल्प पल्ल्याचे क्षेपणास्त्र |
| D. आकाश | IV. सबसॉनिक क्रूझ |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | III | IV | II | I |
| 2) | IV | III | I | II |
| 3) | II | I | III | IV |
| 4) | I | II | IV | III |

11. महाराष्ट्रातील भारतरत्नांबाबत कोणते विधान बरोबर नाही?
1) महाराष्ट्रातून सचिन तेंडुलकर अगोदर 7 व्यक्तींना भारतरत्न म्हणून गौरविले गेले.
2) केवळ एका स्त्रीला भारतरत्न प्रदान केले गेले.
3) एकाच व्यक्तीला मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला.
4) सचिन तेंडुलकर पुरस्कार मिळविणारा प्रथम खेळाडू व सर्वात तरूण असेल.

## बुद्धीमत्ता चाचणी

12. वर्तुळाकार कागदाची आकृतीत दाखवल्याप्रमाणे घडी घातली. उत्तर -4



त्या घडीवर आकृतीत दाखवल्यानुसार पंच करून छिद्रे पाडली.
ह्यां घड्या उलगडल्यावर कागद कोणत्या आकृतीप्रमाणे दिसेल.



(1) (2) (3) (4)

---

13. शाळेने आयोजित केलेल्या सुदृढ व काळजीवाहू माता या स्पर्धेच्या अंतिम टप्प्यासाठी निमा, रझिया, मेरी व झरी या चौघींची निवड झाली आहे. त्यांच्याबद्दलची पुढील माहिती वाचून प्रथन विजेतीचे नाव सांगा.
हिरवा पोशाख घातलेली व्यक्ती सर्वोत्तम सुदृढ व काळजीवाहू माता ठरली आहे.
ओळीने ठेवलेल्या चार खुर्च्यांवर त्या बसल्या आहेत.
त्या सर्वजणींनी पांढऱ्या, गुलाबी, हिरव्या व निळ्या अशा विविध रंगाचे पोशाख परिधान केले आहेत.
त्यांच्यापैकी एकच दुसऱ्या क्रमांकाची विजेती आहे व ती मेरीशेजारी बसली आहे.
दुसऱ्या क्रमांक विजेतीने गुलाबी पोशाख परिधान केला आहे.
झरी ओळीच्या टोकाला (ओळीत शेवटी) बसलेली नाही व तिला दुसरा क्रमांक मिळालेला नाही.
प्रथम व दुसऱ्या क्रमांक विजेत्या व्यक्ती एकमेकांच्या शेजारी बसलेल्या नाहीत.
मेरीने पांढरा पोशाख परिधान केला आहे.
रझियाने गुलाबी पोशाख परिधान केला आहे.
निळा व गुलाबी पोशाख परिधान केलेल्या स्पर्धक ओळीच्या शेवटी बसल्या आहेत.
1) मेरी 2) रझिया 3) निमा 4) झरी

---

14. जानू, नानू, दिलशाद, पास्कू व हानू हे ज्या शहरात काम करतात तेथील एका खोलीत एकत्र रहातात. नानूची आई त्याला भेटून जाताना श्रीखंड वड्या देऊन गेली. खोलीत कोणीही नव्हतं त्यामुळे नानूने त्या पाच समान भागात वाटल्या व तो स्वतःचा वाटा खाऊ लागला. त्याच्या वाट्यातल्या पाच वड्या उरल्या असताना जानू तेथे पोहोचला. नानूने त्याच्या वड्या उरलेल्या वड्यांत ठेवल्या आणि जानूने त्यांचे पाच सारखे भाग केले. जेव्हा या दोघांचा स्वतःचा वाटा खाऊन झाला तेव्हा पास्कू तेथे पोहोचला. त्याने उरलेल्या वड्यांचे पाच सारखे भाग केले. तेथे असलेल्या प्रत्येकाने स्वतःचा वाटा खाल्ला. काही वेळाने हानू व दिलशाद कामावरून परतले व त्यांच्यात सहभागी झाले. त्यांनी उरलेल्या वड्या त्यांच्यामध्ये सारख्या वाटून घेतल्या. जर दिलशादला सहा वड्या मिळाल्या तर नानूने एकूण किती वड्या खाल्ल्या?
1) 71 2) 76 3) 75 4) 70

---

15. कोणत्या नामनिर्देशित प्रतिमा नामनिर्देशित नसलेल्या प्रतिमेला त्याच प्रतलात फिरवून मिळवल्या आहेत?





1) D आणि C 2) A आणि B 3) D आणि B 4) D आणि E

16. मधू, भोलू, कनू, ज्ञानू, मिनू व नलू हे सहा मित्र मैत्रिणी षट्कोनाकार क्षेत्राच्या बाजू तयार होतील अशा पद्धतीनेसहा खुर्च्या मांडून बसले आहेत. मधू ज्ञानूच्या समोर व तो कानूच्या शेजारी उजव्या हाताला बसला आहे. मिनू ही मधू व नलू यांच्या मध्ये बसली असून ती नेमकी भोलूच्या समोर आहे.
पुढीलपैकी तीन जोड्या त्यांच्या बसण्याच्या पद्धतीनुसार समान आहेत म्हणून त्यांचा गट होऊ शकतो. तर कोणती जोडी वेगळी आहे?
1) नलू - भोलू 2) नलू - मधू 3) नलू - मिनू 4) मधू - भोलू

17. जर a × b चा अर्थ a हा b चा भाऊ आहे असा घेतला तर a ×b × c × d या विधानाच्या आधारे पुढीलपैकी कोणत्या विधानाच्या सत्यतेची खात्री देता येणार नाही?
1) a हा b चा भाऊ आहे. 2) a हा c चा भाऊ आहे. 3) a, b व c हे पुरूष आहेत. 4) d हा b चा भाऊ आहे.

18. दिलेल्या आकृतीबंधातील हरवलेला भाग दिलेल्या पर्यायांतून दाखवा : उत्तर- 2



19.



कोणते पर्याय या नक्षीचे भाग नाहीत?

1) D    2) A व B    3) फक्त C    4) वरीलपैकी एकही नाही

---

20. पुढील पदावलीची किंमत किती?

$$\frac{\frac{53}{2}\times 26.5\times\frac{106}{4}-\frac{33}{2}\times\frac{66}{4}\times 16.5}{\frac{53}{2}\times\frac{106}{4}+\frac{106}{4}\times 16.5+\frac{66}{4}\times 16.5}$$

1) 255    2) 128    3) 43    4) 10

---

21. आकृतीचे नीट निरीक्षण करा व उत्तर लिहा.

विमानाची स्थिती आकृतीत दाखविलेली आहे. विमान 'A' 'E' पर्यंत B मार्गे जाते; 'B' 'E' पर्यंत A मार्गे जाते; 'C' 'E' पर्यंत A मार्गे जाते; 'D' 'E' पर्यंत G मार्गे जाते; 'G' 'E' पर्यंत 'F' मार्गे जाते; 'F' 'E' पर्यंत G मार्गे जाते; व 'H' 'E' पर्यंत G मार्गे जाते. सर्व विमाने आपल्या मूळ स्थानापासून निघाल्यावर अर्ध्या तासानी आपल्या इच्छित स्थळांच्या मध्यांतरी कोठे असतील?

विमानाचा वेग, निघण्याची वेळ, सर्व स्थानांतील अंतर समान आहे.




खाली दिलेल्या उत्तरातील कोणते विधान सत्य आहे?

1) 'A' हे 'D' च्या नैऋत्येस आहे.    2) 'A' हे 'D' च्या ईशान्येस आहे.

3) 'C' हे 'A' च्या उत्तरेस आहे.    4) 'F' हे 'A' च्या आग्नेयेस आहे.

---

## भुगोल

THE YASH ACADEMY TM

22. महाराष्ट्रातील पुढील शिखरांचा उंची नुसार उतरता क्रम लावा :

a. कळसुबाई    b. महाबळेश्वर    c. सप्तश्रृंगी    d. तोरणा

e. त्र्यंबकेश्वर

1) a,b,c,d,e    2) a,c,b,d,e    3) a,d,b,e,c    4) a,b,d,c,e

---

23. हिवाळ्यामध्ये पूर्व विदर्भात कोणत्या घटकामुळे पाऊस पडतो?

1) अरबी समुद्रावरून येणारे मोसमी वारे.    2) बंगालच्या उपसागरावरून येणारे मोसमी वारे.

3) बंगालच्या उपसागरावरुन येणारी चक्रीवादळे.    4) अरबी समुद्रावरून येणारी चक्रीवादळे.

---

24. खालील ठिकणे पर्जन्य प्रमाणाच्या उतरत्या क्रमाने लावा.

अ. माथेरान    ब. अंबोली    क. महाबळेश्वर    ड. पाचगणी

1) अ,ब,कड    2) ब,क,ड,अ    3) ब,क,अ,ड    4) क,ब,अ,ड

---

25. जिल्हे व पिके याबाबत पुढील पैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

अ. नाशिक जिल्हा बाजरी उत्पादनात अग्रेसर आहे.    ब. भंडारा जिल्हा भात उत्पादनात अग्रेसर आहे.

क. कोल्हापूर जिल्ह्यात सोयाबीन उत्पादन होत नाही.    ड. ठाणे जिल्ह्यात ऊसाचे उत्पादन घेतले जाते.

1) अ,क,ड    2) अ,ब    3) अ,ब,क    4) क,ड

26. 2001 मध्ये महाराष्ट्रातील कोणता विभाग विहीर सिंचनामध्ये अग्रेसर होता?
1) नागपूर 2) नांदेड 3) कोल्हापूर 4) पुणे

27. खालीलपैकी कोणत्या धरणांचा समावेश कुकडी जल सिंचन प्रकल्पा अंतर्गत होतो?
1) भाटघर, भंडारदरा, पिंपळगावजोगे, वडज, डिंभे 2) पिंपळगावजोगे, माणिकहोड, वडज, भंडारदरा, डिंभे
3) येडगाव, माणिकडोह, पिंपळगावजोगे, वडज, डिंभे 4) येडगाव, येलदरी, हातणूर, वडज, डिंभे

28. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची सुरूवात कोणत्या मुख्यमंत्र्यांच्या काळात झाली?
1) वसंतराव नाईक 2) शंकरराव चव्हाण 3) यशवंतराव चव्हाण 4) वसंतदादा पाटील

29. जोड्या लावा :

| जिल्हे | लोकसंख्या घनता (2001) |
|---|---|
| A. सिंधूदुर्ग | I. 321 |
| B. नासिक | II. 67 |
| C. नंदूरबार | III. 165 |
| D. गडचिरोली | IV. 260 |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | III | I | IV | II |
| 2) | II | I | III | IV |
| 3) | IV | I | II | III |
| 4) | I | II | III | IV |

30. घड्याळाचे काटे ज्या दिशेने फिरतात, त्याप्रमाणे 'अहमदनगर' जिल्ह्याच्या सभोवताली कोणते जिल्हे आहेत, ते ओळखा.
1) नाशिक, जालना, बीड, लातूर, पुणे, ठाणे, धुळे
2) औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, सोलापूर, ठाणे, पुणे
3) नाशिक, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, सोलापूर, पुणे, ठाणे
4) धुळे, नाशिक, जालना, लातूर, सांगली, सातारा, पुणे

THE YASH ACADEMY TM

31. भारताच्या तुलनेत महाराष्ट्राची माहिती पडताळता काय खरे नाही?
1) जिल्ह्यांच्या व खेड्यांच्या संख्येत महाराष्ट्राची भारताशी टक्केवारी सुमारे 7%
2) क्षेत्रफळात व लोकसंख्येत महाराष्ट्राची भारताशी टक्केवारी सुमारे 9 %
3) शेती लागवड क्षेत्रात महाराष्ट्राची भारताशी टक्केवारी सुमारे 11%
4) एकूण वनक्षेत्रात महाराष्ट्राची भारताशी टक्केवारी सुमारे 13%

32. निर्माणाच्या पद्धतीत वेगळा जिल्हा ओळखा.
1) मुंबई उपनगर 2) नागपूर 3) वाशिम 4) हिंगोली

33. नारळाची लागवड झाल्यावर किती वर्षात फळे यावयास लागतात आणि साधारणपणे किती वर्षापर्यंत फळधारणा होत राहाते?
1) 5 ते 10 वर्षात व 50 वर्षापर्यंत 2) 2 ते 3 वर्षात व 30 वर्षापर्यंत
3) 12 ते 15 वर्षात व 75 वर्षापर्यंत 4) 5 ते 10 वर्षात व 100 वर्षापर्यंत

## इतिहास

34. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्यास्तव प्राथमिक शाळा काढल्या, त्या संस्थांना काय म्हटले जाई?
1) बेसिक शाळा 2) ॲन्ग्लोइंडियन शाळा 3) इंग्रजी शाळा 4) चॅरिटी (परोपकारी) शाळा

35. महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळ ..... यांनी सुरू केली.
1) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे 2) महात्मा ज्योतिराव फुले 3) महर्षी धोंडो केशव कर्वे 4) गोपाळ हरि देशमुख

36. ख्रिश्चन धर्मातील समतेने प्रभावित होऊन कोणी ख्रिश्चन धर्म स्वीकारला नाही?
a. पंडिता रमाबाई b. नारायण शेषाद्री c. विष्णू भास्कर करमरकर d. रामकृष्ण विनायक मोडक
e. बाबा पद्मनजी f. नीलकंठ शास्त्री गोऱ्हे g. नारायण वामान टिळक
1) b
2) e
3) g
4) b,e व g ही तिन्ही पर्याय चुकीचे आहेत

37. महाराष्ट्रात सातारा येथे प्रतिसरकार ..... यांनी स्थापन केले.
1) स्वामी रामानंद तीर्थ 2) छत्रपती शाहु महाराज 3) क्रांतिसिंह नाना पाटिल 4) गोपाळ हरि देशमुख

38. यावली, चिमुर आणि आष्टी येथे चलेजाव (भारत छोडो) चळवळ ..... यांच्या प्रेरणेने सुरू झाली.
1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 2) स्वामी रामानंद तीर्थ 3) क्रांतिसिंह नाना पाटिल 4) अच्युतराव पटवर्धन

## भारतीय राज्यघटना

39. व्यक्तींच्या प्रतिष्ठेची खात्री देण्याकरिता राज्यघटनेत केलेल्या तरतूदी अशा आहेत
अ. उद्देशपत्रिकेत 'बंधुभाव' या तत्त्वाचा समावेश केला.
ब. मूलभूत हक्कांद्वारे प्रतिष्ठा सुरक्षित केली आहे.
क. हे हक्क वादयोग्य (दादमागता येणारे) आहेत.
ड. गरजा आणि दुर्दशापासून नागरिकांना मुक्त ठेवण्यासाठी राज्यघटनेत राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केली आहेत.
वर दिलेल्या विधानांपैकी कोणते / कोणती बरोबर आहेत?
1) केवळ अ 2) केवळ अ आणि ब 3) केवळ अ, ब आणि क 4) सर्व

40. भारताच्या संविधानाची 83 वी घटनादुरूस्ती काय सुचविते?
1) अरुणाचल प्रदेशात पंचायतीत अनुसूचित जमातींकरिता आरक्षण नाही.
2) अरुणाचल प्रदेशात पंचायतीत अनुसूचित जातींना आरक्षण नाही.
3) अरुणाचल प्रदेशात पंचायतीत इतर मागास वर्गीयांना आरक्षण नाही.
4) अरुणाचल प्रदेशात पंचायतीत हिंदूकरिता आरक्षण नाही.

41. उद्देशपत्रिकेत बहाल केलेल्या 'स्वातंत्र्याचा' बरोबर क्रम आहे
1) अभिव्यक्ती, विचार, श्रद्धा, विश्वास, उपासना
2) विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, उपासना
3) अभिव्यक्ती, विचार, विश्वास, उपासना, श्रद्धा
4) विचार, अभिव्यक्ती, उपासना, विश्वास, श्रद्धा

42. भारतीय राज्यघटनेच्या नवनिर्मीती क्षमतेचेपुरावे म्हणून पुढे केलेल्या खालील तरतुदींचा विचार करा :
अ. प्रबळ केंद्र आणि केंद्र आणि घटकराज्ये यात अधिकार वाटणी. ब. एकात्म न्यायसंस्था
क. अखिल भारतीय प्रशासकीय सेवा. ड. एकेरी नागरिकत्व.
वरील विधानापैकी कोणते बरोबर आहे / आहेत?
1) केवळ अ 2) केवळ अ आणि ब 3) केवळ अ, ब आणि क 4) सर्व

43. भारतीय संघराज्याचे वर्णन आणि लेखक यांची जुळणी करा :
A. संघराज्याची दुय्यम वैशिष्ट्ये असलेले एकात्म राज्य — I. सर आयव्हर जेनिंग्ज
B. पूर्णपणे संघराज्यही नाही पूर्णपणे एकात्म राज्यही नाही परंतु दोन्हींचा संयोग असलेले — II. ग्रॅनव्हीले
C. प्रबळ केंद्रिकरणाची प्रवृत्ती असलेले संघराज्य — III. दुर्गा दास बसु
D. एकात्म किंवा अद्भूत प्रकारचे संमिश्र राज्य — IV. के. सी. व्हिअर

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | IV | III | I | II |
| 2) | I | II | III | IV |
| 3) | III | IV | II | I |
| 4) | II | I | IV | III |

44. 'बंदीप्रत्यक्षीकरण' आज्ञेबाबतच्या विधानांचा विचार करा :

अ. मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी अशी आज्ञा काढली जाते.

ब. अशी आज्ञा काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालय आणि उच्चन्यायालयांना दिला आहे.

क. व्यक्तीला न्यायालयापुढे हजर करून बंदी करण्याच्या कारणाचे समर्थन करण्याची आज्ञा न्यायालय बंदी करणाऱ्या अधिकाऱ्याला देऊ शकते.

ड. न्यायालयाने फौजदारी गुन्ह्याबद्दल तुरूंगवास दिलेल्या व्यक्तीची सुटका मिळविण्यासाठी देखील अशी आज्ञा काढता येते.

वरील विधानांपैकी कोणते बरोबर आहे / आहेत?

1) केवळ अ 2) केवळ ब आणि क 3) केवळ अ आणि क 4) केवळ अ, ब आणि क

---

45. सहा ते14 वर्षे वय गटातील मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार संविधानांत संशोधन करून भाग III (Part III) मध्ये एक अनुच्छेद (Article) समाविष्ट करून प्रदान केला आहे. कितवे संशोधन व कोणता अनुच्छेद? एक जोडी निवडा.

1) 86 वे संशोधन - अनुच्छेद 19 (फ) 2) 93 वे संशोधन - अनुच्छेद 21 अ

3) 86 वे संशोधन - अनुच्छेद 21 अ 4) 93 वे संशोधन - अनुच्छेद 19 (फ)

---

46. राज्यघटनेत मूलभूत कर्तव्यांचा केलेला समावेश लोकशाहीच्या यशासाठी कसा लाभदायक आहे?

अ. जेव्हा राज्यघटना सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे उद्दिष्ट बाळगते तेंव्हा नागरिकांनी किमान शिस्त पाळली पाहिजे.

ब. राज्याच्या आणि व्यक्तींच्या कल्याणासाठी नागरिकांनी कर्तव्ये मान्य केली पाहिजेत.

क. ही कर्तव्ये मूलभूत हक्कांना पूरक आहेत.

ड. समावेशामुळे सुसंस्कृत समाजातील नागरिकामध्ये नागरी जाणीव विकसित होईल.

वरील विधानांपैकी कोणते बरोबर आहे / आहेत?

1) केवळ अ 2) केवळ ब आणि क 3) केवळ अ, ब आणि क 4) सर्व

---

47. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या आर्थिक स्वातंत्र्याबाबतच्या तरतुदींचा विचार करा :

अ. संसद कायदा करून त्यांचे वेतन आणि भत्ते ठरविते.

ब. नियुक्तीनंतर त्यांना नुकसानकारक होईल अशा प्रकारे वेतन, भत्ते निवृत्तीवेतन यात बदल करता येत नाही.

क. हा सर्व खर्च भारताच्या संचितनिधीतून केला जातो.

ड. आर्थिक आणीबाणीच्या काळात राष्ट्रपती त्यांच्या वेतनात आणि भत्त्यात कपात करू शकतात.

वरील विधानांपैकी कोणते बरोबर आहे / आहेत?

1) केवळ अ आणि ब 2) केवळ ब आणि क 3) केवळ अ, ब आणि क 4) अ,ब,क आणि ड

---

48. कोणत्याही संघ राज्य क्षेत्राचे क्षेत्र वाढविण्याबाबतचे विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते जर त्यास?

1) राष्ट्रपतींनी शिफारस केलेली असली व संबंधित संघ राज्य क्षेत्राच्या अभिप्रायासह

2) राष्ट्रपतींनी शिफारस केलेली असली व संबंधित संघ राज्य क्षेत्राच्या अभिप्रायाशिवाय

3) राष्ट्रपतींच्या शिफारशीशिवाय परंतु संबंधित संघ राज्य क्षेत्राच्या अभिप्रायासह

4) राष्ट्रपतींच्या शिफारशीशिवाय व संबंधित संघ राज्य क्षेत्राच्या अभिप्रायाशिवाय

---

49. योग्य जोड्या लावा :

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| A. मुलभूत अधिकार | I. जर्मनीचे वायमर संविधान |
| B. नीति निर्देशक तत्वे | II. कनाडाचे संविधान |
| C. केंद्र सरकारला उर्वरित अधिकार | III. आयरिश संविधान |
| D. आणीबाणी | IV. अमेरिकेचे संविधान |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| 1) | IV | I | III | II |
| 2) | IV | III | I | II |
| 3) | IV | III | II | I |
| 4) | I | III | IV | II |

50. समवर्ती सूचीत खालीलपैकी कोणता विषय नाही?
अ. फौजदारी कायदा  ब. फौजदारी पद्धती  क. सार्वजनिक आरोग्य  ड. विवाह व घटस्फोट
1) फक्त अ आणि ब  2) फक्त क आणि ड  3) फक्त ब आणि ड  4) फक्त क

51. 'स्वातंत्र्य समतेपासून वेगळे / अलग करता येत नाही, समतेला स्वातंत्र्यापासून वेगळे करता येणार नाही आणि स्वातंत्र्य व समतेला बंधुते पासून वेगळे करता येणार नाही.' हे उद्गार कोणाचे आहेत?
1) पंडीत जवाहरलाल नेहरू  2) डॉ. राजेंद्र प्रसाद  3) डॉ. एस. राधाकृष्णन  4) डॉ. बी. आर. आंबेडकर

52. उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालय माहिती अधिकाराच्या, 2005 कक्षेत येत नाहीत.
1) विधान - बरोबर  2) विधान - चूक
3) फक्त सर्वोच्च न्यायालय कक्षेत येते  4) फक्त उच्च न्यायालये कक्षेत येतात

53. ...... हे केंद्रीय माहिती आयोगाचे पहिले मुख्य माहिती आयुक्त होते.
1) श्री रंगनाथ मिश्रा  2) श्री वजाहत हबीबुल्ला  3) श्री सत्यानंद मिश्रा  4) श्री शैलेश गांधी

54. मागितलेली माहिती ही जर व्यक्तीच्या जीवित अथवा स्वातंत्र्याशी निगडित असेल तर ती माहिती पुढील वेळेत दिली पाहिजे.
1) 24 तास  2) 48 तास  3) एक आठवडा  4) 15 दिवसात

## संगणक व माहिती तंत्रज्ञान

55. ए.टी.एम. या शब्दांची फोड ..... अशी आहे. (नेटवर्कींग मध्ये)
1) ऑल टाईम मनी  2) असिंक्रोनिअस ट्रांसफर मोड
3) ऑटोमेटेड टेलर मशीन  4) वरीलपैकी सर्व पर्याय

56. अंधासाठी टेक्स्ट-टू-ब्रेल आणि स्पीच यांना एकत्र करून तयार कलेल्या माहितीची देवाण घेवाण करणाऱ्या सिस्टीम चे नाव .... आहे.
1) श्रुती-दृष्टी  2) दूर-दृष्टी  3) इ-ब्रेल  4) पर्याय (1) व (2)

YASH ACADEMY

57. खालीलपैकी शासनाची कोणती सर्विस मोबाईल वर टाकल्यास शासनाच्या सेवा बद्दल माहिती पुरवते?
1) मोबाईल - इ गर्व्हनंस सर्विस डिलीव्हरी गेटवे  2) स्टेट इ-गर्व्हनंस सर्विस डिलीव्हरी गेटवे
3) मिडीया इ- गर्व्हनंस सर्विस डिलीव्हरी गेटवे  4) मॉडर्न इ- गव्हर्ननंस सर्विस डिलीव्हरी गेटवे

58. डब्ल्यू. थ्री. सी या संक्षेची फोड ... अशी आहे.
1) वर्ल्ड वाईड वेब कंपनी  2) वर्ल्ड वाईड वेब कास्केड
3) वर्ल्ड वाईड वेब कॉंसोरटीअम  4) वर्ल्ड वाईड वेब कंटेंट

59. पहिला भारतीय सुपर कॉम्प्युट कोणता?
1) मॅक  2) सी-डॅक  3) परम - 8000  4) परम - 80000

60. खाली दिलेल्या नावांपैकी मीडिया लॅब एशियाचा कोणता प्रोजेक्ट 11 वी 12 वी च्या गणित व जीवशास्त्र (लाईफ सायन्स) या विषयासाठी बनलेला आहे?
1) ई-सायन्स  2) ई-विज्ञानशाळा  3) ई-लाईफ सायन्स-मॅथर  4) ई-मॅथ-लाईफ सायन्स

61. खालीलपैकी कोणती भारतीय संस्था मायक्रोव्हेव व इलेक्ट्रोमॅग्नेटीक इंजिनिअरिंग क्षेत्रात काम करते?

1) समीर 2) अमीर 3) मीर 4) सीमीर

62. पूर्णतः शैक्षणिक सेवांसाठी जी.एस.एल. व्ही - एफ - 01 च्या सहाय्याने सप्टेंबर 2004 मध्ये कार्यान्वित करण्यात आलेला भारताचा पहिला थिमॅटिक उपग्रह .... हा आहे.
1) ई-सॅट 2) ईड्यूसॅट 3) इ-एज्युकेशन 4) इ-सॅट-कॉम

63. डी.इ. आइ.टी.व्हाय (म्हणजेच डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी) ने 'ओळख मॅनेजमेंट' साठी जी सिस्टम तयार केली आहे ती .... या नावाने ओळखली जाते.
1) इ-प्रमाण 2) आधार 3) इ-आयडेंटीटी 4) इ-आयडी

## मानवी हक्क व जबाबदाऱ्या

64. अनुसूचित जाति व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, 1989 हा ...... करीता अधिनियमित करण्यात आला.
अ. अनुसूचित जाति व अनुसूचित जमाती विरूद्ध होणारे अत्याचाराचे (Atrocities) गुन्हे थांबवण्यासाठी.
ब. अत्याचाराचे खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करणे.
क. मदत मिळवून देण्याकरिता.
ड. अशा प्रकारच्या गुन्ह्याच्या बळी ठरलेल्या व्यक्तीचे पुनःर्वसन करण्याकरिता.
1) अ फक्त 2) अ आणि ब फक्त 3) अ, क आणि ड 4) वरील सर्व

65. अनुसूचित जाति व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, 1989 अनुसार 'अत्याचार' म्हणजे
अ. अभक्षणीय व किळस उत्पन्न करणारा पदार्थ खाण्यास किंवा पिण्यास भाग पाडणे.
ब. 'भिक' मागण्यास किंवा वेटबिगारी करण्यास प्रवृत्त करणे किंवा सक्ती करणे.
क. खोटे दिवाणी किंवा फौजदारी गुन्हे दाखल करणे.
ड. मतदान करण्यास प्रतिबंध घालणे किंवा एखाद्या विशिष्ट उमेदवारास मतदान करण्यास भीती दाखवून भाग पाडणे.
1) अ आणि ब फक्त 2) ब फक्त 3) अ आणि क फक्त 4) वरील सर्व

66. खालील विधानांचा हुंडा प्रतिबंधक अधिनियम, 1961 च्या अनुशंगाने विचार करा व बरोबर पर्याय निवडा :
अ. छेद 8 अंतर्गत चे गुन्हे हे दखलपात्र व आपसात न मिटण्याजोगे आहेत.
ब. छेद 8 अ अंतर्गत गुन्हा केला नाही हे सिद्ध करण्याची सर्वस्वी जबाबदारी आरोपी वर असते.
क. प्रत्येक हुंडा प्रतिबंधन अधिकारी आपले कार्य व अधिकारांचा वापर शक्य तितक्या प्रमाणात असे गुन्हे होण्यापासून किंवा हुंड्याची मागणी करण्यापासून टाळण्याचा / रोखण्याचा प्रयत्न करेल.
ड. 'तारण' हा शब्द एखाद्या दस्तऐवज किंवा एखाद्या कायदेशीर अधिकार निर्माण करणारा दस्ताऐवज दर्शवतो.
1) अ फक्त 2) ब आणि क फक्त 3) क आणि ड फक्त 4) वरील सर्व

67. तिसरी नैरोबी जागतिक परिषद कशासाठी आयोजित केली गेली होती?
अ. संयुक्त राष्ट्रांच्या महिला दशकाचा मुल्यन व आढावा घेण्यासाठी तसेच समानता, विकास व शांततेसाठी.
ब. स्त्रियां विरूद्धच्या अत्याचाराचे उच्चाटन करण्यासाठी.
क. राष्ट्रीय स्तरावर स्त्रियांना सर्वोच्च पातळी गाठण्याकरिता विशिष्ट प्रक्रिया / प्रणाली तयार करण्यासाठी.
ड. संयुक्त राष्ट्रांच्या वरिष्ठ पदांवर महिलांची नियुक्ति करण्यासाठी प्रक्रिया / प्रणाली विकसित करणे.
1) अ फक्त 2) अ आणि ब फक्त 3) ब, क आणि ड 4) अ, ब आणि ड

68. भारतीय संविधान व आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक या दोन्ही मध्ये कोणत्या संदर्भात साम्यता आढळून येते?
1) मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे 2) केंद्र आणि राज्य सरकार मधील परस्पर संबंध
3) संसदीय सरकार पद्धत 4) आणिबाणी तरतूद

69. सर्व देशांत मानव अधिकारासाठी पक्षपातरहित संस्थेची प्रस्थापना करण्यात पुढाकार कोणी घेतला?

1) आय.एल.ओ. (ILO) 2) यूनेस्को (UNESCO) 3) यूनीसेफ (UNICEF) 4) डब्ल्यू. टी. ओ. (WTO)

70. भारतामध्ये राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना कुठल्या वर्षी झाली?
1) 1990 2) 1991 3) 1992 4) 1993

71. जर एखाद्या व्यक्तीला अस्पृश्य म्हणून, नवीन खोदलेल्या हापशीचे पाणी घेण्यास मनाई केली तर खालीलपैकी कोणता अधिनियम योग्य रित्या वापरता येईल?
1) भारतीय दंड संहिता, 1860 2) अंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक
3) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 4) वरील सगळे

72. खालीलपैकी कोणत्या तक्रारीची चौकशी मानव अधिकार आयोग करू शकते?
1) मानव अधिकार चे उल्लंघन 2) सार्वजनिक सेवकाकडून अश्या उल्लंघनांना प्रतिबंध करण्यास हयगय
3) (1)आणि (2) 4) परकीय आक्रमणामुळे हिंसाचार

73. हुंडा प्रतिबंधक अधिनियम, 1961 व्यतिरिक्त कोणत्या कायद्यामध्ये हुंड्या विरूद्ध तरतूद आहे?
1) भारतीय साक्ष अधिनियम, 1872 2) फौजदारी व्यवहार संहिता, 1973
3) भारतीय दंड संहिता, 1860 4) वरील सर्व

74. हुंडा प्रतिबंधक अधिनियम, 1961 च्या अंतर्गत हुंड्याची जाहिरात केल्यास किती कालावधी चा कारावसा होऊ शकतो?
1) 6 महिन्यापेक्षा कमी नाही, 4 वर्षा पर्यंत वाढू शकतो 2) 6 महिन्यापेक्षा कमी नाही, 5 वर्षा पर्यंत वाढू शकतो
3) 6 महिन्यापेक्षा कमी नाही, 6 वर्षा पर्यंत वाढू शकतो 4) 6 महिन्यापेक्षा कमी नाही, 7 वर्षा पर्यंत वाढू शकतो

75. भारतामध्ये देवदासी पद्धत एक धार्मिक प्रथा म्हणून प्रचलित आहे. योग्य पर्याय निवडा.
1) देवदासी पद्धत महिलेच्या मानव अधिकारांचे उल्लंघन आहे. 2) देवदासी पद्धत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे.
3) देवदासी पद्धत मानवाचा दुव्यापार या मध्ये समाविष्ट होते. 4) वरील सगळे

THE YASH ACADEMY TM

76. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 नुसार गुन्ह्यास सहाय्य करणाऱ्या व्यक्तीस पुढील शिक्षा होते
1) गुन्ह्यास असलेली शिक्षा 2) दुप्पट शिक्षा 3) अर्धी शिक्षा 4) वरीलपैकी एकही नाही

77. मानव अधिकारांचा वैश्विक जाहिरनामा कोणत्या दिवशी झाला?
1) 10 ऑगस्ट 1948 2) 10 सप्टेंबर 1948 3) 10 डिसेंबर 1948 4) वरीलपैकी नाही

78. पुढील अधिकारांमुळे मानवी अधिकार तयार झाले :
1) कायदेशीर अधिकार 2) नैसर्गिक अधिकार 3) सामान्य अधिकार 4) वरीलपैकी नाही

79. असमानता ही राज्यघटनेच्या पुढील कलमाने प्रतिबंधीत केली आहे?
1) 10 2) 14 3) 19 4) 21

80. बालसुधार अधिनियम, 2000 अनुसार आरोपीचे वय किती असावे?
1) 21 वर्षांखाली 2) 18 वर्षांवर 3) 18 वर्षांखाली 4) 21 वर्षांवर

81. 'मानव अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्ये हे सर्व मानवांचे जन्मसिद्ध अधिकार आहेत.' ही उद्घोषणा खालीलपैकी कोणत्या दस्तावैजात समाविष्ट होती?

1) व्हिएन्न घोषणा, 1993
2) मानवाधिकाराची सार्वभौमिक घोषणा (UDHR), 1948
3) जिनोसाईड (नरसंहार) विरोधी अभिसरण व शिक्षा, 1951
4) छळ, क्रूर, अमानवीय कृत्ये व मानभंग करणाऱ्या वागणुकी पासून संरक्षण व शिक्षांविषयी घोषणा, 1975

82. 'कायद्याची प्रक्रिया ही योग्य असली पाहिजे' असा निर्वाळा या खटल्यात दिला आहे.
1) डी. के. राणा वि. भारत सरकार
2) गडकरी वि. महाराष्ट्र राज्य
3) मेनका गांधी वि. भारत सरकार 4) सुरज वि. केरळ राज्य

## मुंबई पोलीस कायदा

83. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत 'गुरेढोरे' च्या व्याख्येमध्ये कोणत्या प्राण्याचा समावेश नाही?
1) हत्ती 2) उंट 3) मेंढ्या 4) कुत्रा

84. जिल्ह्यातील पोलिस अधिक्षक आणि पोलिस बळ कुणाच्या नियंत्रणाखाली असतात?
1) जिल्हा दंडाधिकारी
2) जिल्हा व सत्र न्यायाधीश
3) (1) आणि (2) दोन्ही
4) ह्यापैकी कोणीही नाही

85. मुंबई पोलीस अधिनियमांअंतर्गत, पंतग उडविण्यास मनाई करता येते का? योग्य पर्याय निवडा.
अ. होय, पोलिस विभागाला पतंग उडविण्यास मनाई करता येते.
ब. लोकांना, इजा होण्यास कारणीभूत म्हणून पतंग उडविण्यास मनाई करता येते.
क. नाही, पोलीस पतंग उडविण्यास मनाई नाही करू शकत.
ड. पतंग उडविणे मराठी सणाचा भाग आहे म्हणून पतंग उडविण्यास मनाई नाही करता येत.
1) अ फक्त 2) अ आणि ब फक्त 3) क फक्त 4) क आणि ड फक्त

86. बॉम्बे पोलीस कायदा, 1951 कुठे लागू होतो?
1) बॉम्बे 2) महाराष्ट्र 3) महाराष्ट्र आणि गोवा 4) महाराष्ट्र आणि गुजरात

YASH ACADEMY TM

87. बॉम्बे पोलीस कायदा, 1951 नुसार खालीलपैकी कोणते कृत्य हे गुन्हा नाही
1) 14 वर्षांपेक्षा जास्त वयाचा दिसत असेल अशा मुलाकडून तारण घेणे.
2) खेळांमध्ये फसविणे
3) रस्त्यावर जुगार खेळणे
4) एखाद्या व्यक्तिने भटक्या मुलांना कोंडवाड्यात घालणे

88. खालीलपैकी कोणती बाब / विषय बॉम्बे पोलीस अधिनियम, 1951 या कायद्याअन्वये हाताळला गेला नाही?
1) पोलीस दलाचे अधीक्षण, नियंत्रण आणि त्याची संघटना
2) पोलीस दलाचे विनियमन, नियंत्रण ठेवणे व त्यांच्यात शिस्त राखणे
3) मानवी शरीराविरोधी अपराध
4) सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपाययोजना

89. पोलीस अधिकाऱ्याची खालीलपैकी कोणती कर्तव्ये आहेत?
1) समन्स बजावणे आणि वॉरंटची अंमलबजावणी करणे
2) सार्वजनिक उपद्रव होण्यापासून थांबविणे
3) (1) आणि (2) दोन्ही
4) (1) आणि (2) दोन्ही नाही

## भारतीय दंड संहिता

90. भारतीय दंड संहिता, 1860 कोणत्या क्षेत्रात लागू आहे?
अ. संपूर्ण भारतात.

ब. जम्मू व काश्मीर राज्या व्यतिरिक्त संपूर्ण भारतात.
क. जम्मू व काश्मीर राज्याला स्वतंत्र दंड संहिता आहे.
ड. भारतीय दंड संहिता सर्व राज्यांसाठी समान आहे.
1) अ फक्त  2) ब आणि क फक्त  3) क फक्त  4) अ आणि ड फक्त

91. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीमध्ये सदोष मनुष्यवध हा खून नसतो?
1) जेव्हा सदोष मनुष्यवध हा स्वतःचा बचाव करण्याच्या हक्काचा कायदेशीर वापर करतांना झाला असेल.
2) जेव्हा सदोष मनुष्यवध हा आकस्मिक भांडणातून संतापाच्या भरात आकस्मिक मारामारी सुरू झाली असता झाला असेल.
3) जेव्हा सदोष मनुष्यवध गंभीर व आकस्मिक प्रक्षोभामुळे स्वतःवरचा ताबा सुटल्याने झाला असेल
4) वरीलपैकी सर्व पर्याय

92. भारतीय दंड संहिता, 1860 प्रमाणे '' ..... वर्षाच्या मुलाने कोणतेही कृत्य केले तरी तो गुन्हा नसतो.''
1) 5  2) 6  3) 7  4) 8

93. जर सहा पुरूष हल्ला करण्यास गेले आणि त्यातील तीन पुरूषांनी मारले परंतु तीन ने नाही मारले. कुठला पर्याय योग्य आहे?
1) सगळे सहा पुरूष हल्ल्यासाठी जबाबदार नाहीत.
2) फक्त तीन पुरूष ज्यांनी मारले ते जाबाबदार आहेत.
3) ज्या तीघांनी मारले नाही ते निष्पाप आहे.
4) सगळे सहा पुरुष हल्ल्यासाठी जबाबदारी आहेत आणि प्रत्येक जण अशाप्रकारे जबाबदार असेल की त्याने स्वतः संपूर्ण इजा केली आहे.

## फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973

94. फौजदारी प्रक्रिया संहितेबाबत कोणते विधान चुकीचे आहे?
1) फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 ची आहे.
2) ती जम्मू-काश्मीर राज्यास लागू नाही.
3) त्यातील काही तरतूदी नागालँड राज्यास लागू नाहीत.
4) संहितेच्या सर्व तरतूदी जनजाती क्षेत्रांना लागू आहेत.

95. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 अन्वये निर्वाह भत्त्याची सोय (उपाययोजना) ही कुणाकरिता उपलब्ध करून दिली आहे.
1) हिन्दूकरिता  2) मुस्लीमाकरिता  3) ख्रिश्चनांकरिता  4) सर्व धर्माच्या सर्व लोकांकरिता

THE YASH ACADEMY TM

96. फौजदारी कार्यवाहीमध्ये गुन्हा सिद्ध करण्याचा भार हा
1) अभियोग पक्षावर असतो कि आरोपीने गुन्हा केला
2) आरोपीवर असतो कि तो निर्दोष आहे
3) दोन्ही पक्षावर असतो
4) एकतर (1) नाहीतर (2)

97. एखाद्या पीडित मुलीचे वय वैधकीय पुराव्यानुसार जर 17 ते 18 वर्ष दाखवत असेल, परंतु जर प्रत्यक्ष कागदोपत्री पुरावा वय 18 वर्ष दर्शवित असेल तर अश्या प्रसंगी खालील कुठला पर्याय योग्य आहे?
1) मुलीचे वय 17 वर्ष गृहीत धरले जाईल.
2) मुलीचे वय 18 वर्ष गृहीत धरले जाईल.
3) मुलीचे वय डॉक्टर च्या मतानुसार ठरेल जर प्रत्यक्ष पुरावा विश्वसनीय नसेल.
4) कागदोपत्री प्रत्यक्ष पुरावा डॉक्टरच्या पुराव्यापेक्षा वरचढ ठरेल.

98. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 अन्वये खालीलपैकी कोणत्या तरतुदी खऱ्या आहेत?
अ. पोलिस ठाणे प्रमुख त्याचे पोलिस ठाणे क्षेत्रात जे अधिकार वापरू शकतो तेच अधिकार अशा ठाणे प्रमुखाच्या क्षेत्राचा वरीष्ठ पोलीस अधिकारी सुद्धा वापरू शकतो.
ब. एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने कि ज्याला एखाद्या व्यक्तीला अटक करण्याचे अधिकार आहेत त्याने कोणत्याही नागरिकाची मदत मागितल्यास त्याला मदत करणे अशा व्यक्तीचे कायदेशीर कर्तव्य आहे.
क. एखादी खाजगी व्यक्ती सुद्धा दुसऱ्या अशा व्यक्तीला, की जी त्याच्या डोळ्यादेखत अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा करीत आहे, त्याला अटक करून पोलिस ठाण्यास नेऊ शकते.
ड. असा पोलिस अधिकारी ज्याला कोणत्याही विनावारंट अटक करण्याचे प्राधिकार आहे तो एखाद्या व्यक्तीला अटक करण्याकरिता त्याच्या मूळ कार्यक्षेत्राबाहेरही भारतात कुठेही पाठलाग करू शकतो.

1) अ फक्त 2) ब आणि क 3) अ, ब आणि क 4) अ, ब, क आणि ड

## भारतीय पुरावा कायदा (Indian Evidence Act.)

99. भारतीय पुराव कायदा, 1972 अन्वये 'पुरावा' या संज्ञेमध्ये खालीलपैकी कोणत्या बाबी सर्वसाधारणपणे अंतर्भूत होतात?
अ. तोंडी व कागदोपत्री पुरावा.
ब. परिस्थितीजन्य पुरावा.
क. पोलिस अधिकाऱ्याने आरोपीने गुन्हा केल्याबद्दलचे घेतलेले त्याचे कबुलीपत्र
ड. सह आरोपीने पोलीस अधिकाऱ्यासमोर मुख्य आरोपीविरूद्ध दिलेला कबुली जबाब.
इ. न्यायिक प्राधिकाऱ्याने मागितले नसले तरी आरोपीने स्वतःहून सादर केलेले कोणतेही प्रतिज्ञापत्र
1) अ आणि ब 2) अ, ब आणि इ 3) अ,ब,क आणि ड 4) क, ड आणि इ

100. भारतीय दंड संहिता, 1860 अंतर्गत खालीलपैकी कोणत्या बाबी गुन्हा या सदरात येणार नाहीत?
अ. डॉक्टरने पेशंटची संमती घेऊन त्याच्यावर काळजीपूर्वक शस्त्रक्रिया करतांना पेशंट दगावल्याने डॉक्टरवर मनुष्यवधाच गुन्हा.
ब. डॉक्टरने एखाद्या पेशंटला तपासल्यानंतर सहेतूने तो असाध्य रोगाने पिडीत असून लवकरच त्याचा मृत्यू होणार आहे असे सांगितल्याने धक्का बसून व्यक्तीचा जागेवर मृत्यू झाल्यास डॉक्टरवर मृत्यूस कारणीभूत झाल्याबद्दल गुन्हा.
क. ठार वेड्या व्यक्तीने वेडाच्या भरात एखाद्या व्यक्तीला जिवे मारल्यास.
1) वरील सर्व गुन्हे आहेत 2) वरीलपैकी एकही गुन्हा सदरात येत नाही
3) केवळ 'ब' व 'क' गुन्हे आहेत 4) 'अ' व 'क' गुन्हे आहेत, 'ब' नाही

### ANS KEY - पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परिक्षा - 2013 सामान्य अध्ययन - पेपर २

| Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 21 | 1 | 41 | 2 | 61 | 1 | 81 | 1 |
| 2. | 4 | 22 | 1 | 42 | 4 | 62 | 2 | 82 | 3 |
| 3. | 4 | 23 | 3 | 43 | 1 | 63 | 1 | 83 | 4 |
| 4. | 4 | 24 | 3 | 44 | 4 | 64 | 4 | 84 | 1 |
| 5. | 3 | 25 | 2 | 45 | 3 | 65 | 4 | 85 | 2 |
| 6 | 1 | 26 | 4 | 46 | 4 | 66 | 4 | 86 | 2 |
| 7 | 2 | 27 | 3 | 47 | 4 | 67 | 1 | 87 | 4 |
| 8 | 2 | 28 | 3 | 48 | 2 | 68 | 1 | 88 | 3 |
| 9 | 4 | 29 | 1 | 49 | 3 | 69 | 2 | 89 | 3 |
| 10 | 1 | 30 | 3 | 50 | 4 | 70 | 4 | 90 | 2 |
| 11 | 3 | 31 | 4 | 51 | 4 | 71 | 3 | 91 | 4 |
| 12 | 4 | 32 | 2 | 52 | 2 | 72 | 3 | 92 | 3 |
| 13 | 4 | 33 | 4 | 53 | 2 | 73 | 4 | 93 | 4 |
| 14 | 1 | 34 | 4 | 54 | 2 | 74 | 2 | 94 | 4 |
| 15 | 3 | 35 | 4 | 55 | 2 | 75 | 4 | 95 | 4 |
| 16 | 3 | 36 | 4 | 56 | 1 | 76 | 1 | 96 | 1 |
| 17 | 4 | 37 | 3 | 57 | 1 | 77 | 3 | 97 | 4 |
| 18 | 2 | 38 | 1 | 58 | 3 | 78 | 2 | 98 | 4 |
| 19 | 3 | 39 | 4 | 59 | 3 | 79 | 2 | 99 | 1 |
| 20 | 4 | 40 | 2 | 60 | 2 | 80 | 3 | 100 | 2 |